# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक - ११
## सभावृत्तांत

दिनांक - १९.६.२०१२ वेळ - दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक १९.६.२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगदीश शेट्टी सभापती
२) मा.अविनाश (दादा)टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.जम सोनाली पोपट
६) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
७) मा.पाडाळे निता विलास
८) मा.जगताप नवनाथ दत्तु
९) मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१०)मा. भोसले राहुल हनुमंतराव
११) मा.चोंधे आरती सुरेश
१२)मा.भालेकर अरुणा दिलीप
१३) मा.अश्विनी गजानन चिंचवडे - पाटील

याशिवाय मा. प्रकाश कदम - अति.आयुक्त, मा.सावंत - सह आयुक्त,मा.मुंढे, मा.कारचे, मा.गायकवाड,मा.ढेरे, मा.गावडे,मा.पवार,मा.बंब, मा.दुरगुडे - सहा.आयुक्त,मा.चाकणकर-प्र.नगरसचिव,मा.घाडगे - मुख्यलेखापरिक्षक, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.चव्हाण - सह शहर अभियंता, मा.भदाणे - उपसंचालक(नगररचना) मा.दुधेकर,मा.ढगे,मा.सवणे,मा.इंगळे,मा.पाटील,मा.जाधव,मा.जाधव,मा.कुदळे,मा.चिंचवडे, मा.कपिले,मा.थोरात,मा.साळवी,मा.तांबे,मा.पठाण,मा.लडकत,मा.पिरजादे-कार्यकारी अभियंता,मा.पवार-कायदा सल्लागार (प्र.),मा.माछरे- विशेष अधिकारी मा.पाटील - प्रशासन अधिकारी,मा.चोरगे - भांडार अधिकारी,मा.जगताप- समाज कल्याण अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-

विषय क्रमांक : २४) अपंग खेळाडुंना क्रीडा शिष्यवृत्तीचे वाटप करणेबाबत..मा.सोनाली जम,मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- २५) वाय सी एम रुग्णालयात शव विच्छेदन कक्षात सफाई कामगार नेमणेबाबत..मा.सोनाली जम,मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- २६) जाहिरात प्रसिध्दीबाबत..मा.सोनाली जम,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- २७) नळ कनेक्शन देणेबाबत..मा.सोनाली जम,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- २८) विद्यार्थ्यांना मोफत बस पास देणेबाबत..

विषय क्रमांक :- २९) सभा आयोजनाबाबत..मा.सुषमा तनपुरे,मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ३०) अपंग कल्याणकारी योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती देणेबाबत..

विषय क्रमांक :- ३१) मनपा अधिकारी यांना फिरती वाहन भत्ता सुरु ठेवणेबाबत..मा.विनया तापकीर, मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव..

--------

अ) दिनांक ५/६/२०१२ व १२/६/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ९) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

मा.अश्विनी चिंचवडे :- मा.स्थायी समिती सभा दिनांक १२/६/२०१२ ठराव क्रमांक ५९९ मध्ये-"मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे" या मजकुरा ऐवजी "मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन" हा मजकुर तसेच "८५% पेक्षा जास्त गुणे घेणा-या" व "प्रस्तावात नमुद प्रमाणे" या मजकुराऐवजी -

"

| अ.क्र. | गुण टक्केवारी पुर्णांकित | बक्षिस देय र.रु. |
|---|---|---|
| १. | ८०% ते ८५.९९% | २५,०००/- |
| २. | ८६% ते ९०.९९% | ५०,०००/- |
| ३. | ९१% व त्या पुढील | १,००,०००/- |

याप्रमाणे" मजकुर नमुद करणेची दुरुस्ती करणेत यावी.

ब) मा.स्थायी समिती सभा दिनांक १२/६/२०१२ ठराव क्रमांक ५९९ मध्ये-"मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे" या मजकुरा ऐवजी "मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन" हा मजकुर तसेच "८५% पेक्षा जास्त गुणे घेणा-या" व "प्रस्तावात नमुद प्रमाणे" या मजकुराऐवजी -

"

| अ.क्र. | गुण टक्केवारी पुर्णांकित | बक्षिस देय र.रु. |
|---|---|---|
| १. | ८०% ते ८५.९९% | २५,०००/- |
| २. | ८६% ते ९०.९९% | ५०,०००/- |
| ३. | ९१% व त्या पुढील | १,००,०००/- |

याप्रमाणे" मजकुर नमुद करणेची दुरुस्ती करणेत आल्याचे व त्यादुरुस्तीसह दिनांक १२/०६/२०१२ व १३/०६/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १०) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

--------

ठराव क्रमांक - ६२७ विषय क्रमांक - १

दिनांक - १९/६/२०१२

सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.अविनाश टेकावडे

संदर्भ:- १) मा.जयश्री गावडे,मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव...

२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक १६/५/२०१२ रोजी ठराव क्र.८

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील विविध क्रीडा प्रकारातील विविध प्रकारचे खेळाडू अतिशय मेहनती व होतकरु असून विविध खेळांमध्ये कौशल्य प्राप्त करीत असतात. शहरातील या गुणी खेळाडूंना परदेशात प्रशिक्षण किंवा स्पर्धेत भाग घेणेसाठी निवड होते. परंतु हे सर्व खेळाडू सर्वसामान्य कुटूंबातील असल्यामुळे व आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे कौशल्य असूनही त्यांना परदेशात जाणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये भाग घेण्यापासून वंचित राहतात व गुणवत्ता असूनही केवळ आर्थिक बाबींमुळे ते मागे पडतात. त्यामुळे सांधिक खेळातील खेळाडूंना प्रत्येकी र.रु.५,०००/- वैयक्तिक खेळासाठी खेळाडूस र.रु.१०,०००/- आर्थिक मदत देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६२८ विषय क्रमांक - २
दिनांक - १९/६/२०१२ विभाग - झोनिपु स्थापत्य
सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे जा.क्र.झ ोनिपु/स्था/नि/कावि/२१२/
२०१२ दि.१/६/१२

मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

झो.नि.पु.स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/-२०११/१२ मधील अ.क्र.६० मनपाच्या झो.नि.पु. स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/-२०११/१२ मधील अ.क्र.६० अन्वये, प्रभाग क्र.१०३ मधील महात्मा फुलेनगर झोपडपट्टीमध्ये स्थापत्य विषयक कामाची दुरुस्ती देखभाल करणेकामी मे.बरखा एन्टरप्रायजेस (नि.र.रू.९,२२,९१३/- [र.रू.नऊ लाख बावीस हजार नऊशे तेरा] पेक्षा १० % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा दर मंजुर दराने र.रू.८,३०,६२२/- पर्यंत काम करून घेण्यास बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६२९ विषय क्रमांक - ३
दिनांक - १९/६/२०१२ विभाग - झोनिपु स्थापत्य
सुचक :- मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक :- मा.नवनाथ जगताप
संदर्भ:- मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे जा.क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२१३
/२०१२ दि.१/६/१२

मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झो.नि.पु.स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/-२०११/१२ मधील अ.क्र.१० अन्वये प्रभाग क्र.१०३ मधील जयभिमनगर स.नं.६८ ते ७४ या झोपडपट्ट्यामधील स्थापत्य विषयक कामांची दुरुस्ती व देखभाल करणेकामी मे.बरखा एन्टरप्रायजेस (नि.र.रू.९,२२,९१३/- [र.रू.नऊ लाख बावीस हजार नऊशे तेरा] पेक्षा ८.१०% कमी) या ठेकेदाराकडुन निविदा दर मंजुर दराने र.रू.८,४८,१५७/- पर्यंत काम करून घेण्यास बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६३० विषय क्रमांक - ४
दिनांक - १९/६/२०१२ विभाग - झोनिपु स्थापत्य
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :- मा.सोनाली जम
संदर्भ:- मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे जा.क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२१४
/१२ दि.१/६/१२

मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झो.नि.पु.स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/२०११/१२ मधील अ.क्र.५३ अन्वये, प्रभाग क्र.१०४ सिध्दार्थनगर झोपडपट्टीमध्ये किरकोळ दुरुस्ती कामे करणेकामी मे.बरखा एन्टरप्रायजेस (नि.र.रू.९,२२,९१३/- [र.रू.नऊ लाख बावीस हजार

नऊशे तेरा] पेक्षा ८.१० % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा दर मंजुर दराने र.रू.८,४८,१५७/- पर्यंत काम करून घेण्यास बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६३१ विषय क्रमांक - ५
दिनांक - १९/६/२०१२ विभाग - झोनिपु स्थापत्य
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:-मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे जा.क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२१५ /१२ दि.१/६/१२

मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झो.नि.पु.स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/- २०११/१२ मधील अ.क्र. ११ अन्वये प्रभाग क्र.१०२ मधील झोपडपट्टीमध्ये शौचालयाची दुरुस्ती करणे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी मे.बरखा एन्टरप्रायजेस (नि.र.रू.९,२२,९१३/- [र.रू.नऊ लाख बावीस हजार नऊशे तेरा] पेक्षा ८.१०% कमी) या ठेकेदाराकडुन निविदा दर मंजुर दराने र.रू.८,४८,१५७/- पर्यंत काम करून घेण्यास बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६३२ विषय क्रमांक - ६
दिनांक - १९/६/२०१२ विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक :- मा.नवनाथ जगताप अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/२/कावि/१३१/१२दि.४/६/१२
विषय :- मनपाच्या विविध विभागासाठी आवश्यक टोनर खरेदीबाबत..

विषय क्रमांक ६ चा विचार दि.१८/०९/२०१२ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६३३ विषय क्रमांक - ७
दिनांक - १९/६/२०१२ विभाग -
सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.अविनाश टेकावडे
संदर्भ:- १) मा.रामदास बोकड,मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ६/६/२०१२ ठराव क्र.९

विषय :- कै. मधुकर पवळे व्यायाम शाळा सेवाशुल्कावर चालविण्यास देणेबाबत..

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६३४ विषय क्रमांक - ८
दिनांक - १९/६/२०१२
सुचक :- मा.नवनाथ जगताप अनुमोदक :- मा.आरती चोंधे
संदर्भ:- १) मा.निलेश पांढरकर,मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव -
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ६/६/२०१२ ठराव क्र.१०
विषय :- कै.मुरलीधर माचुत्रे व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देणेबाबत..

विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६३५ विषय क्रमांक - ९
दिनांक - १९/६/२०१२ विभाग - ब प्रभाग
सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.बप/कावि/लेखा/कॅश/१९०/२०१२दि.६/६/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ब प्रभाग कार्यालयातील तिजोरीचे कुलुप बदलणेकामी गोदरेज ॲन्ड बॉयस मॅन्यु. कंपनी लि. या उत्पादित कंपनीकडून थेट पध्दतीने करारनामा न करता उक्त तिजोरीचे कुलुप बदलून घेणेस व त्यासाठी र.रू.११,१०६/- [र.रू.अकरा हजार एकशे सहा] रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६३६ विषय क्रमांक - १०
दिनांक - १९/६/२०१२ विभाग - जनतासंपर्क व स्वागतकक्ष
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जसं/१/कावि/१८७/२०१२दि.५/६/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

संततुकारामनगर येथे पालखी रिंगण सोहळ्या निमित्त पंडीत उपेंद्र भट यांच्या संतवाणी कार्यक्रमाचे मानधन र.रू.२७,०००/- [र.रू.सत्तावीस हजार] आगाऊ अदा करण्यात आलेली असल्याने झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६३७ विषय क्रमांक - ११
दिनांक - १९/६/२०१२ विभाग - कायदा
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :- मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.कास/६/कावि/१६२/२०१२दि.५/६/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या हद्दीतील भोसरी टेल्को रोडवर मनपाचे वाहन डंपर गाडी क्र.एम.एच.१४ एफ ७९०९ व दुचाकी वाहनाबरोबर अपघात झाल्याने व सदर अपघातामध्ये वादी क्र.१ चे पतीचे निधन झाल्याने वैद्यकीय व इतर खर्चापोटी नुकसान भरपाई मिळणेकामी दावा दाखल केला असून मे.न्यायालयाने दि.१४/११/२०११ रोजी सदर दाव्यात दिलेल्या

आदेशानुसार एकूण र.रू.११,३०,४४०/- रक्कम व्याजासह दावा दाखल केल्याच्या दिनांकापासून संबंधीतास अदा करणेकामी लवकरात लवकर मे.न्यायालयात भरणे आवश्यक असल्याने त्यास व कायदा विभागाकडील वाहनाची नुकसान भरपाई या लेखाशिर्षावर सदरची रक्कम खर्ची टाकण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६३८ विषय क्रमांक - १२
दिनांक - १९/६/२०१२ विभाग - मुख्य लेखा परिक्षक
सुचक :- मा.नवनाथ जगताप अनुमोदक :- मा.सुभद्रा ठोंबरे
संदर्भः- मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/२७/२०१२दि.५/६/१२

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.३०.४.१२ ते ६.५.१२ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/२७/२०१२ दि.५.६.२०१२ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे..

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६३९ विषय क्रमांक - १३
दिनांक - १९/६/२०१२ विभाग - मुख्य लेखा परिक्षक
सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भः- मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/२८/२०१२दि.५/६/१२

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.७.५.१२ ते १३.५.१२ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/२८/२०१२ दि.५.६.२०१२ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६४० विषय क्रमांक - १४
दिनांक - १९/६/२०१२ विभाग - मुख्य लेखा परिक्षक
सुचक :- मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक :- मा.अविनाश टेकावडे
संदर्भः- मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/२९/२०१२दि.५/६/१२

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१४.५.१२ ते २०.५.१२ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/२९/२०१२ दि.५.६.२०१२ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६४१ विषय क्रमांक - १५
दिनांक - १९/६/२०१२ विभाग - मुख्य लेखा परिक्षक
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.विनया तापकीर
संदर्भ:- मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/३०/२०१२दि.५/६/१२

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२१.५.१२ ते २७.५.१२ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/३०/२०१२ दि.५.६.२०१२ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६४२ विषय क्रमांक - १६
दिनांक - १९/६/२०१२ विभाग - मध्यवर्ती साहित्य भांडार
सुचक :- मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक :- मा.नवनाथ जगताप
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मसाभां/२/कावि/२९३/२०१२दि.११/६/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पल्स पोलिओ मोहिमेकरिता आवश्यक लागणारे बर्फ लादी खरेदीकामी जादा येणाऱ्या र.रू.४,७२५/- [र.रू.चार हजार सातशे पंचवीस] चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६४३ विषय क्रमांक - १७
दिनांक - १९/६/२०१२ विभाग - स्थापत्य
सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :- मा.विनया तापकीर
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१/कावि/७५०/२०१२दि.११/६/१२
विषय - निगडी सेक्टर क्र.२२ येथील गुरूदत्त उद्यानाचे नुतनीकरण करणेबाबत..

विषय क्रमांक १७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६४४ विषय क्रमांक - १८
दिनांक - १९/६/२०१२ विभाग - स्थापत्य
सुचक :- मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/लेखा/१/कावि/२४५/२०११दि.११/६/१२
विषय - प्राधिकरण ४५ मी स्पाईन रोडवरील दुभाजक मध्ये कर्बिंग व चेनलिंक फेन्सींग करणेबाबत..

विषय क्रमांक १८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६४५ विषय क्रमांक - १९
दिनांक - १९/६/२०१२ विभाग - पाणीपुरवठा
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.अश्विनी चिंचवडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/नि/कावि/७०१/२०१२दि.११/६/१२

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.१०/२०११-१२ मधील अ.क्र.१ अन्वये, जलशुध्दीकरण केंद्र से.क्र.२३ टप्पा क्र.४ चे Automation करणेकामी मे.रेक्ट्रॉनिक डिव्हायसेस अँण्ड सिस्टिम्स (नि.र.रू.३,१२,७९,०६४/- [र.रू.तीन कोटी बारा लाख एकोणऐंशी हजार चौसष्ट] पेक्षा ३% कमी) या ठेकेदाराकडून करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६४६ विषय क्रमांक - २०
दिनांक - १९/६/२०१२ विभाग - विद्युत क प्रभाग
सुचक :- मा.नवनाथ जगताप अनुमोदक :- मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वि/कप्र/जावक/४३७/२०१२दि.८/६/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे भोसरी येथील चक्रपाणी वसाहत रोड, भोपते वस्ती, सद्गुरूनगर पांजरपोळ गव्हाणेवस्ती येथील स्ट्रीट लाईट करिता नवीन वीज मीटर बसविणे करिता वीजमीटर शुल्क र.रू.५२,०२४/- [र.रू.बावन्न हजार चोवीस] म.रा.वि.वि.कं. मर्या.यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६४७ विषय क्रमांक - २१
दिनांक - १९/६/२०१२ विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक :- मा.निता पाडाळे अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/८/कावि/१६३/२०१२दि.१३/६/१२
विषय - मनपाच्या विविध विभागासाठी आवश्यक छपाई साहित्य छपाई करून पुरवठा करणेबाबत..

विषय क्रमांक २१ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६४८ विषय क्रमांक - २२
दिनांक - १९/६/२०१२ विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.सुभद्रा ठोंबरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/१०/कावि/१५८/२०१२दि.१३/६/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे वाहन दुरुस्ती कार्यशाळा विभागासाठी ऑईल, ग्रीस खरेदीकामी निविदा न मागविता, करारनामा न करता तातडीची बाब म्हणून मनपास आवश्यक वेगवेगळ्या प्रकारचे ऑईल, ग्रीस मे.हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लि पुणे यांचेकडून उपलब्ध

तरतूद एकूण र.रू.१५,००,०००/- मध्ये आवश्यतेनुसार टप्या-टप्याने थेट खरेदी करणेस व येणाऱ्या एकूण र.रू. १२,६१,७१३/- [र.रू.बारा लाख एकसष्ट हजार सातशे तेरा] खर्चास व सदरची रक्कम मे.हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लि पुणे यांना आगाऊ स्वरूपात टप्या-टप्याने अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६४९ विषय क्रमांक - २३
दिनांक - १९/६/२०१२ विभाग - प्रशासन
सुचक :- मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक :- मा.आरती चोंधे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशासन/४/कावि/३५३/२०१२दि.१२/६/१२

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन -

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी पुणे (यशदा) यांच्या कडील पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन अर्बन मॅनेजमेंट या प्रशिक्षणास दरवर्षी महानगरपालिकेचे तीन अधिकारी व प्रतिनियुक्तीवरील एक अधिकारी याप्रमाणे अधिकाऱ्यांना पाठविणेस व त्याकरिता यशदा वेळोवेळी निर्धारीत करील ती फी अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -</u>**

ठराव क्रमांक - ६५० विषय क्रमांक - २४
दिनांक - १९/६/२०१२
सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :-मा.अश्विनी चिंचवडे-पाटील
संदर्भ:-मा.सोनाली जम, मा.अश्विनी चिंचवडे-पाटील यांचा प्रस्ताव...

महापालिकेतर्फे शहरातील राष्ट्रीय व राज्यस्तरीय शालेय खेळाडूंना जसे क्रीडा शिष्यवृत्तीचे वाटप करतो त्याचप्रमाणे अपंग खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्तीचे वाटप करण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६५१ विषय क्रमांक - २५
दिनांक - १९/६/२०१२
सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :-मा.अश्विनी चिंचवडे-पाटील
संदर्भ:-मा.सोनाली जम, मा.अश्विनी चिंचवडे-पाटील यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयामधील शव विच्छेदन कक्षामध्ये गेली दोन वर्षांपासून कायमस्वरुपी सफाई कामगार नियुक्ती केल्यानंतर सदर सफाई कर्मचाऱ्यांनी उच्च न्यायालयामध्ये केस दाखल केली आहे की, आम्ही फक्त शवविच्छेदनगृहामध्ये फक्त साफसफाई करण्यासाठी नियुक्ती झालेली आहे. परंतु आमच्याकडून पोस्टमार्टेम करुन घेतले जात आहे. सदर केस संदर्भात मा.आयुक्त यांना नोटीस बजावण्यात आलेली आहे. नोटिसमध्ये सफाई कर्मचाऱ्यांना शवविच्छेदन करण्यासाठी सक्त मनाई केलेली आहे. तरी कर्मचारी अपुरा असल्यामुळे जुन्या

कर्मचाऱ्यांवर ताण व मानसिक त्रास व सुट्या मिळत नाहीत. तरी मानधनावरील सफाई कर्मचारी यांनी सुमारे १० ते १२ वर्षे शवविच्छेदनगृहामध्ये सफाई कर्मचारी म्हणून काम केलेले आहे. पिंपरी चिंचवड शहर इतर परीसरातील मृतदेह शव विच्छेजनासाठी येत असतात. त्यामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांना वेळेत शवाचे विच्छेदन करणे अवघड होत आहे व या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत आहे. त्यामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मदतीसाठी राम हसन्नाप्पा रेड्डी, मनोज राम रेड्डी, शशिकांत रामदास जाधव, नितिन भीमराव गायकवाड व सचिन संपत घोलप यांना पूर्वानुभवाच्या आधारे शव विच्छेदन कक्षामध्ये र.रु.७,०००/- (अक्षरी र.रु.सात हजार फक्त) एकत्रित मानधनावर सफाई कामगार पदावर नेमणुक करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६५२ विषय क्रमांक - २६

दिनांक - १९/६/२०१२

सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :-मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:-मा.सोनाली जम, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव...

प्रत्येक महिन्याच्या मा.महापालिका सभेची नोटीस स्थानिक दैनिक वृत्तपत्रात जाहीरातीद्वारे प्रसिद्धीकामी त्यानुसारच्या वृत्तपत्राचे नाव प्रत्येक महिन्यात त्या महिन्याच्या पाच तारखेचे आत नगरसचिव कार्यालयास कळविणेची खबरदारी जनतासंपर्क व स्वागत कक्ष विभागाने घ्यावी तथापि ज्या ज्या वेळी काही अपरिहार्य कारणास्तव जनतासंपर्क व स्वागतकक्ष विभागाकडुन संबंधित महिन्याच्या पाच तारखेचे आत स्थानिक दैनिक वृत्तपत्राचे नाव सभा नोटीस जाहिरात प्रसिद्धीकामी नगरसचिव कार्यालयाकडे येवु शकणार नाही. त्या त्या वेळी कायदेशीर तरतुदींचा भंग होवु नये यास्तव विशेष बाब म्हणुन लगत पुर्वीचे कार्यपद्धतीप्रमाणे पवना समाचार या वृत्तपत्रात सभा नोटीस प्रसिद्धीस देणेची कार्यवाही नगरसचिव कार्यालयाने करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६५३ विषय क्रमांक - २७

दिनांक - १९/६/२०१२

सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :-मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:-मा.सोनाली जम, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव...

श्री.अयुब गुलाब शेख यांना त्यांचे प्लॉट नं. २०७ भगवंत चाळ, दत्तनगर, निगडी, प्राधिकरण ४४ येथे नळ कनेक्शन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६५४ विषय क्रमांक - २८
दिनांक - १९/६/२०१२ विभाग - माध्यमिक शिक्षण
सुचक :- मा.नवनाथ जगताप अनुमोदक :-मा.सुभद्रा ठोंबरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/३/कावि/३७६/१२ दि.१९/६/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षात पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खाजगी मान्यताप्राप्त शाळांतील व मनपाचे सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांतील इ.५ वी ते १० वी चे विद्यार्थी/विद्यार्थीनींस मोफत बसपास देणेची योजना राबविणेस व सदरची योजना पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.पुणे यांचेमार्फत राबविणेस व त्याकामी अंदाजे र.रु.७ कोटी व येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६५५ विषय क्रमांक - २९
दिनांक - १९/६/२०१२
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :-मा.विनया तापकीर
संदर्भ:-मा. सुषमा तनपुरे,मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव...

मंगळवार दिनांक २६/०६/२०१२ दुपारी ३.०० ची साप्ताहिक मा.स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक २८/०६/२०१२ दुपारी ३.०० वा. आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६५६ विषय क्रमांक - ३०
दिनांक - १९/६/२०१२ विषय :- नागरवस्ती विकास योजना
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :-मा.सोनाली जम
संदर्भ:-मा.अति.आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/८/कावि/१३०/२०१२दि.१८/६/२०१२

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

अपंग कल्याणकारी योजना क्र.१ अन्वये मनपा हद्दीतील अंध,अपंग, मतिमंद, मुकबधिर, अनाथ, निराधार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत जाहिर प्रकटनानुसार अर्ज मागविले असुन त्यानुसार ३९३ अर्ज प्राप्त झाले असुन ३५८ अर्ज पात्र आहेत. सदर ३५८ पात्र लाभार्थींना सन २०११-१२ करिता इयत्ता निहाय शिष्यवृत्ती अदा करणेकामी एकुण र.रु. १८,१९,०००/- तसेच यापुढे अपात्रेची पुर्तता करुन पात्र होणा-या लाभार्थ्यांन पोटी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६५७ विषय क्रमांक - ३१
दिनांक - १९/६/२०१२
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :-मा.आरती चोंधे
संदर्भ:-मा.विनया तापकीर,मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव -
मनपाच्या कर्मचारी/अधिकारी यांना स्वत:चे वाहन वापरल्यामुळे र.रु. १९,०००/- देण्यात येत होते. ते सध्या बंद केलेले आहे. मनपाच्या आर्थिक दृष्टया कमी खर्च होण्याकरीता अधिकारी यांना वाहन भत्ता सुरु ठेवण्यास व येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(जगदीश शेट्टी)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/९३०/२०१२
दिनांक - २१/०६/२०१२ चे लगत

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.